सामना

# मासूम आणि सेहत संस्थेतर्फे छत्रपती संभाजीनगरात कार्यशाळा

**आरोग्य अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची उपस्थिती**

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी) – महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम) पुणे व सेहत या संस्थेमार्फत छत्रपती संभाजीनगरात दोन दिवस कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हास्तरीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

या कार्यशाळेमध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना विविध आरोग्य कार्यक्रमांविषयक महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बाळकृष्ण लांजेवार, जिल्हा आरसीएच अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक उपस्थित होते.



Sambhajinagar Edition
Jul 10, 2024 Page No. 6